
चांदोबा

डिसेंबर १९७४















चांदोबा

संस्थापक : नागिरेड्डी

संचालक : 'चक्रपाणी'

या अंकाबरोबर बहुरंगी दीर्घकथा "महाबली हनुमान" प्रारंभ होत आहे. रामायणातली हनुमानाची गोष्ट सर्वांना माहीतच आहे. परंतु आमच्या बाल-वाचकांस कदाचित माहीत असेल की हनुमानाची कथा अनेक पुराणांतही वर्णिली आहे. म्हणून निरनिराळ्या पुराणांचे मंथन करून नवनीतासारखी मृदुमधुर अशी ही कथा बालमित्रांच्या ज्ञानवृद्धीसाठी या अंकापासून देण्यात येत आहे. ही गोष्ट नक्कीच लहान थोर सर्वांस आवडेल.

वर्ष : २४ डिसेंबर १९७४ अंक : ६





मित्रभेद

[१६]

संजीवकाने दमनकाला हंसाची गोष्ट सांगितली व म्हणाला–“विश्वास करणारा मूर्ख वेडा माणूस, पूर्वी जसा एक उंट लबाड वस्तादांच्या भुलावण्यावर फसला होता तसा फसतो.”

“ती गोष्ट ऐकू दे तरी!” दमनकाने गोष्ट सांगायला सांगितले.

संजीवक गोष्ट सांगू लागला.

फसवणुकीला बळी पडलेला उंट

सागरदत्त नावाचा एक मोठा व्यापारी होता. तो एकदां शंभर उंटांचा एक तांडा घेऊन परदेशी निघाला. उंटांवर मूल्यवान वस्तूंची मोठमोठी गाठोडी होती.

त्या उंटांपैकी विकेट नावाच्या उंटावर थोडा जास्त माल लादला गेला. शेवटी त्याला चालवेनासे झाले तेव्हां तो एका जागी बसला. व्यापाऱ्याने त्याच्या पाठीवरचा माल थोडा थोडा करून इतर उंटांच्या पाठीवर टाकला आणि त्या उंटाला त्या अरण्यातच सोडले व तांडा घेऊन पुढे निघून गेला.

व्यापारी निघून गेल्यावर बऱ्याच वेळाने त्या उंटाला जागचे थोडे हालतां येऊ लागले. तो हिरवळ खात व खड्ड्याखाचीतले पाणी पीत थोडा हिंडू फिरू लागला.


त्या अरण्यात मदोत्कट नावाचा एक सिंह रहात असे. त्याच्या सेवेला एक चित्ता, एक कावळा आणि एक कोल्हा नित्य रहात असत. त्या सिंहाला तो उंट दिसला. त्याने आपल्या सेवकांना विचारले–“हा कोणता तरी विचित्र प्राणी दिसतो आहे! कायपण रूप आणि रंग! हा जंगलात राहणारा हिंस्त्र पशू आहे की ... आहे?”

कावळ्याने उंटाला पूर्वी पाहिले होते. तो सिंहाला म्हणाला–“हे पाळलेले जनावर आहे. याला उंट म्हणतात. याचे मांस फार चवदार असते.”

ते ऐकून सिंह म्हणाला–“माझ्यावर विश्वास ठेवून माझ्याकडे अतिथी म्हणून आलेल्याशी मी कधी दगलबाजी करणार नाही. अतिथी देवासमान असतो. त्याच्या हत्येचे पाप ब्रह्महत्त्येसारखे महा पाप मानले जाते. म्हणून त्या उंटाला माझ्या वतीने अभयवचन देऊन त्याला माझ्याकडे बोलावून घेऊन या. तो कशासाठी आला आहे, माझ्याजवळ त्याचे काय काम आहे, मी विचारून घेतो!”

सिंहाचे सेवक उंटाला जाऊन भेटले आणि सिंहाच्या वतीने अभयवचन देऊन त्याला सिंहाकडे बोलावून घेऊन आले. उंटाने येऊन पायावर डोके ठेवल्यावर सिंहाने त्याला विचारले–“काय रे बाबा! तू या अरण्यात कसा काय आलास?”

उंटाने आपल्यावर गुदरलेला सर्व प्रसंग थोडक्यात सांगितला. तेव्हां सिंह म्हणाला–“तू आपल्या गावी पुन्हां जाऊ नकोस आणि ओझे वाहू नकोस. माझ्याबरोबर अरण्यातच राहून हिरवे गवत व पाला खा.”



त्याप्रमाणे उंट निश्चितपणे अरण्यात राहू लागला. सिंहाचा चौथा सेवक झाला.

असाच काही काळ लोटला आणि सिंहाची एका हत्तीशी झुंज झाली. त्यात सिंहाला हत्तीचा दांत लागला. त्यामुळे त्याला गुहेबाहेर येणे जाणे अशक्य झाले.

त्या स्थितीत पांच दिवस गेले. सिंह व त्याचे तीन सेवक उपाशी राहले. कारण सिंह शिकार करून आला म्हणजे स्वतः पोटभर खाऊन उरलेले सर्व आपल्या सेवकांसाठी ठेवीत होता. त्यावर सर्वांचे पोट भरत असे. परंतु आतां सिंहाची शिकार बंद झाली होती. फक्त उंट एकटा हरवळीवर हिंडून फिरून पोटभर खाई

आणि तो चांगला गलेलठ्ठ होत चालला होता.

आपल्या अनुयायांना त्या दीन स्थितीत पाहून सिंह त्यांना म्हणाला–"मीं जखमी होऊन आजारी पडलो आहे, तेव्हां तुम्हीच जंगलातल्या एखाद्या प्राण्याला मारून त्यावर आपला उदरनिर्वाह चालवा."

"आमच्या महाराजांची ही स्थिती असतां आम्ही खुशाल पोट भरून खाणे कसे काय जमेल?" कोल्हा म्हणाला.

सिंह म्हणाला–"तुमची स्वामि भक्ती पाहून माझ्या मनाचे समाधान झाले. तुम्ही जाऊन एखाद्या प्राण्याची शिकार करून आणा. आपण सर्व मिळून खाऊ या."

परंतु त्याचे सेवक काहीच बोलले नाहीत. तेव्हां सिंह म्हणाला–

"अरे! यात संकोच करण्यासारखे काय आहे? जाऊन वाटेल तो प्राणी धरून घेऊन या, मी या स्थितीतही त्याला ठार करून तुमची पोटे भरण्याची व्यवस्था करीन."


[illegible] शोधार्थ निघाले. परंतु त्यांना एकदेखील शिकार मिळाली नाही. तेव्हां कोल्हा व कावळा दोघे इतर कोणाला ऐकू जाणार नाही इतक्या हलक्या आवाजात बोलू लागले.

कोल्हा म्हणाला–"कावळोबा! आपले हे फिरणे बघ अगदी फुकट आणि निरर्थक आहे! या उंटाची चरबी वाढलेली दिसते आहे ना तुला? याला ठार केले तर आपल्याला कित्येक दिवस मेजवानी उडवायला मिळेल!"

तेव्हां कावळा म्हणाला–"कोल्होबा! तू म्हणालास ते खरं आहे रे, पण या उंटाला आपल्या धन्याने अभयवचन दिले आहे ना!

"तसं असेल तर मी धन्याकडे जाऊन उंटाला ठार करण्याची परवानगी विचारून येतो." असे कावळ्याला कानात सांगून कोल्हा इतरांना म्हणाला–"मित्र हो! तुम्ही सर्व येथेच थांबा! मी आपल्या धन्याकडे जाऊन पुढे काय करायचे ते त्याला विचारून येतो!"





तिळ्या बहिणी

[४]

[आपल्या तिघां मुलींना गिधाडे उचलून घेऊन गेल्याचे राजाने सांगितल्यावर सर्व जणांचा विश्वास बसला. एकदां रात्री त्याची मुलगी सुहासिनी त्याच्या शैयागृहात आली. राजा तिला तिच्या दाईजवळ सोडून शैयागृहाकडे जाणाऱ्या भुयाराची वाट पाहून परतला तर त्याला सुहासिनी किंवा तिची दाई कोणीच भेटल्या नाहीत. पुढे–]

भुयाराच्या वाटेने बाहेर निघायला आणखी एकादी चोरवाट तर नाही, असा विचार करून राजा काही वेळ वाट शोधत राहल्यावर त्याला एकाएकी एक दार दिसले. दारातच दाई व सुहासिनी भेटल्या. राजाला जिवात जीव आल्यासारखे झाले. तो त्या दारातून आत गेला तेव्हां सुहासिनी-साठी त्याने नेमलेले शैयागृह असल्याचे त्याला आढळले.

त्या विचित्र चोरवाटेचे गुपित काय बरे असेल याचा शोध काढल्यावर त्याला कळले की सुहासिनीच्या खोलीत भिंतीला लागून जे मोठेमोठे आरसे होते ते जमिनी-पासून छप्परापर्यंत चिकटलेले होते. त्या आरशात एक आरसा विचित्र होता. जमिनीवर एका जागी एक कळ होती. ती दाबली की आरसा जमिनीत गडप होऊन जाई आणि त्या जागी एक मोठे दार होई.



त्या दारानेंच भुयारातली वाट राजाच्या शैयागृहात जात होती. खोलीत कळ होती तशीच दाराबाहेर एक कळ होती. ती दाबली म्हणजे दार आपोआप बंद होई. पुन्हां दाबले की आरसा जमिनीत जाई आणि दार असल्याचे कळे.

आता सुहासिनी राजाच्या झोपायच्या खोलीत कशी पोचली पाहू या. नेहमी-प्रमाणे दाईने सुहासिनीला तिच्या पलंगा-वर झोपविले व ती झोपली असेल असे समजून स्वतः झोपली. परंतु त्या दिवशी रात्री सुहासिनीची झोप मध्येच मोडली. तिला काय करावे, सुचेना. म्हणून ती खोलीत फिरत असतां तिचे [illegible] जी कळ होती तिच्यावर पडले. लगेच आरसा जमिनीत गेला आणि एक मोठे दार दिसू लागले.

ती अद्‌भुत गोष्ट घडल्यावर ती भिण्या-ऐवजी भुयाराच्या वाटेने गमतीखातर चालू लागली आणि राजाच्या खोलीत एका मोठ्या तसबीरीमागे जे दार होते तेथे येऊन पोचली. पुढे वाट नाही असे पाहून तिने चाचपून आणखी कोठे वाट आहे का पाहिले तेव्हां राजाच्या खोलीतली तसबीर तिच्या हाताचा जो हलकासा धक्का लागला तेवढ्यानेच पाठीमागून ढकलली जाऊन दारासारखी खोलीत जायला वाट झाली. तेव्हां तिला पलंगावर तिचे बाबा झोपत असलेले दिसले. ती धावतच आत गेली आणि आपल्या बाबांच्या अंगावर चढून बसली. त्यानंतर राजा त्या भुयाराच्या वाटेने बराच वेळ वाट शोधीत भटकत राहिला होता.

अशा तऱ्हेने भुयाराच्या त्या वाटेचे गुपित कळल्यानंतर राजाला एकाबाजूने आनंद झाला तर दुसऱ्या बाजूने त्याच्या मनांत शंकाकुशंका येऊ लागल्या. कारण वाट उद्यानातून होती, म्हणून इतके दिवस कोणाच्या दृष्टीस पडल्याशिवाय राजाला भुयारात जाऊन भीतभीत बाहेर यावे लागत [illegible] गृहातून भुयारात जाऊन कोणाची नजर पडल्याशिवाय परत येणे त्याला शक्य होते. म्हणून मुलींना वाटेल तेव्हां भेटून यायाला सोयीचे झाले होते. अर्थात् या गोष्टीचा राजाला आनंद वाटत होता.

परंतु राजाला आणखी एक भीती वाटू लागली. जास्त काळजी घेतली नाही तर सुहासिनी अगर तिच्या इतर दोघी बहिणी वाटेल तेव्हां त्याच्या शैयागृहात येतील व त्यांना कोणी पाहिले तर ज्या गोष्टीसाठी त्यांना इतके दिवस भुयारात ठेवले होते तीच गोष्ट नेमकी होणार नाही. मग त्या शैयागृहातच नव्हे तर राजवाडाभर आणि त्यानंतर राजावाड्याबाहेर देखील हिंडू फिरू लागतील. तेव्हां काय करावे, या विचारात राजा गढून गेला.

शेवटी त्याला एक उपाय सुचला. त्या वेळेपर्यंत राजाने आपल्या तिघां मुलींना भुयारातल्या वाड्यात निरनिराळ्या तीन खोल्यात त्यांच्या दाईबरोबर ठेवले होते. परंतु राजाने त्यापुढे तो चोर दरवाजा होता ती खोली कायमची रिकामी ठेवायचे ठरविले आणि उरलेल्या दोन खोल्यात तिघां मुलींना ठेवण्याची व्यवस्था केली. म्हणजे तो चोर दरवाजा मुलींना कळणार नाही आणि त्यांना त्या वाटेने



शैयागृहात येतां येणार नाही. त्याने मुलीं-च्या दाईंना ती गोष्ट समजावून सांगितली आणि जास्त सावधगिरी बाळगण्यास सांगितले. तेव्हां कोठे त्याचे चित्त थोडे शांत झाले.

त्यानंतर बरेच दिवस राजा मुलींना भेटायला गेलाच नाही. परंतु एके दिवशी तो आरशाच्या खोलीत चोरवाटेने आला. चोर वाटेतली कळ दाबताच आरसा जमि-नीत गेला. नंतर खोलीत आल्यावर पुन्हां आतली कळ दाबल्याबरोबर आरसा वर आला आणि दार बंद झाले.

राजाने ती चोरवाट दाखविणाऱ्या देवाचे व आपल्या भाग्याचे आभार मानले.



नंतर मुलींना भेटून तो निश्चिंतपणे आपल्या खोलीत परत गेला.

*　　*　　*

त्या दिवसापासून राजा निदान एकदां तरी आपल्या खोलीतून भुयारात जाऊन मुलींना भेटून येऊ लागला. दिवसामागून दिवस जात होते. मुलींना त्या भुयारातल्या महालातले जीवन आवडेनासे झाले. बाप भेटायला येई तेव्हां तेव्हां मुली त्याला बरोबर घेऊन जायला हट्ट करू लागल्या. त्या राजाला धरूनच बसायच्या व म्हणायाच्या–"बाबा! आज नाही सोडणार आम्ही तुम्हांला! आम्हांला बरोबर घेऊन चला आईकडे! आज घेऊन गेलेच पाहिजे."

[illegible] जाणार. त्याला तेवढे धैर्य होईना. इतके दिवस केलेली खटपट फुकट जाण्याची भीती होती. म्हणून तो त्यांना म्हणे–"आतां नको, बेटा! पुन्हां केव्हां तरी घेऊन जाईन!" अशा तऱ्हेने मुलींची समजूत घालून तो निघून जाई.

हळूहळू म्हणतां महिन्यांमागून महिने लोटले. तिघी मुली आनंदाने कोणत्याही प्रकारचे विघ्न आल्याशिवाय वाढत होत्या. राजाच्या आनंदाला पारावार नव्हता. परंतु राणीमात्र मुलींच्या काळजीने दिवसेदिवस खंगत चालली होती. कारण मुलींना शोधून आणण्यासाठी गेलेले नोकर एकेक करून परत येऊ लागले व मुली कोठे ही न दिसल्याचे सांगू लागले. मधून मधून राणी ज्योतिष्याला बोलवून विचारी–"ज्योतिषीबुवा! माझ्या मुलींच्या जिवाला धोका तर नाहीं ना?"

"महाराणी! आपण निश्चिंत असावे, मुली, आहेत तेथे नक्कीच खुशाल आहेत. त्यांच्या बरोबर गेलेल्या दासी व नोकरचाकर सर्व खुशाल आहेत. महाराणींनी व्यर्थ काळजी करू नये. काही दिवसांनी सर्व सुखरूप परत येतील अशा सूचना मुलींच्या कुंडलीत आहेत." असे ज्योतिषी राणीला सांगे. ते ऐकून राणी मनाचे [illegible] दिवस गप्प राही.

अशा तऱ्हेने दोन वर्षे लोटली. राजा दररोज चोर दरवाजाने भुयारातल्या वाड्यात जाऊन मुलींना भेटून येत होता. मुलीदेखील अगदी सुरक्षित होत्या. त्यांच्या विषयी काळजी वाटण्याचे कारणच राहले नाही. तरी राजा त्यांना भेटून परत येई तेव्हां मुली बरोबर घेऊन जायला अधिकाधिक आग्रह करू लागल्या.

"बाबा! आम्हांला तुम्ही इकडे एकट्या सोडून कां हो जातां? आईला भेटायचे आहे आम्हांला. फक्त एकदां आईकडे घेऊन जा!" असे सांगत त्या राजाला धरूनच बसत व राजाने किती सांगितले तरी ऐकत नसत. त्यांना रडत असलेल्या पाहून राजाचे हृदय कळवळून येई. तो मनात म्हणे–"काय हरकत आहे, एकदां आईजवळ जाऊन आल्या म्हणजे त्यांना व आईला बरे वाटेल." परंतु तसे करायला त्याचे मन धजेना आणि तो मनाशी म्हणे–"काय वाटेल ते होवो, मन घट्ट करून एक वर्षभर मुलींना असेच भुयारातच राहू द्यावे." म्हणून मुली किती रडल्या तरी राजाने, या ना त्या तऱ्हेने त्यांची समजूत घालून त्यांना घरी नेले नाही.

असेच आणखी काही दिवस गेले. मुलींना सातवे वर्ष लागायला फक्त चारच दिवस उरले. ते चार दिवस गेले की मुली निश्चिंतपणे आपल्या घरी जाऊन आईला





भेटतील. त्यांना या कैदेतून सुटका मिळेल. इतके दिवस, लागोपाठ तीन वर्षे त्यांना भुयारातल्या वाड्यात निश्चितपणे मी ठेवू शकलो ही काय सामान्य गोष्ट झाली? आतां भिण्याचे काही कारण उरले नाही. आणखी चार दिवस, फक्त चार दिवस सुरक्षितपणे निघून जातील आणि कुंडली-तल्या विघ्नासंकटांतून त्यांची सुटका होईल. मायलेकींची भेट होईल. राजा या विचा-रात थोडावेळ स्वत:ला विसरून गेला.


त्या मन:स्थितीत राजा गुप्तमार्गाने मुलींना भेटायला भुयारातल्या वाड्यात आला. तो अगदी शेवटचा दिवस होता. त्या भूगृहात दुसऱ्या दिवसापासून राहण्याची

[illegible] पाहून मुलींनी त्याच्या पायांना विळखाच घातला आणि म्हणाल्या–"बाबा! या खेपेस तुम्ही आम्हांला बाहेर घेऊन गेलां नाही तर तुम्हांला आम्ही जाऊच देणार नाही." असे म्हणत त्यांनी बापाच्या पायांना घट्ट मिठीच मारली.

राजाचे मन द्रवले. त्याला धीर धरवेना. तो विचार करू लागला–"ही तीन वर्षे निर्विघ्न पार पडली. आता उरले ते फक्त चोवीस तास काय होणार आहे? याशिवाय इतके लोक पाहारा देत आहेत! मुलींवर कोणतेच संकट येण्याची शक्यता नाही." असा मनाशी विचार करून व मनातले सर्व साहस एकवटून तिघां मुलींना, त्यांच्या दाईंना आणि शंभर नोकरांचाकरांना बरोबर घेऊन तो उद्यानात आला आणि स्वत: त्यांच्या बरोबर बसला.

मुलींच्या चारी बाजूला शंभर नोकर पाहारा देत बसले होते. इतक्या दिवसांनी उघड्या हवेत आल्याचा सर्वांना आनंद झाला. मुली आनंदाने उड्या मारू लागल्या. त्यांना नाचत बागडत असलेल्या पाहून राजाला स्वर्गसुख मिळाल्यासारखे झाले.

इतक्यात पूर्वी कधी ऐकले नाही की कधी पाहिले नाही असे एक मोठे चक्री वादळ एकाएकी आले. जमिनीपासून



आकाशापर्यंत धुळीचे लोट उठले. सर्वांनी एक क्षणभरच डोळे मिटले. पुन्हां डोळे उघडून पाहतात तर तीन घारी आल्या आणि तिघां मुलींना उचलून उडत असलेल्या आकाशात दिसल्या. ते पाहून राजा बेशुद्ध होऊन पडला. दाईनी राजाला शुद्धीवर आणण्यासाठी खूप प्रयत्न केला. शंभरचे शंभर नोकर त्या घारी उडाल्या होत्या त्या दिशेला पळत निघाले.


राजाने शुद्धीवर येतांच विचारले की नोकर सगळे कोठे गेले? त्याच वेळी ते परत येत असलेले दिसले. ते काही करू शकले नव्हते. मुलींचा शोध न लागल्यामुळे त्यांचे चेहरे उतरलेले होते. बरोबर तीन वर्षांपूर्वी राजाने जी कल्पित गोष्ट रचून राणीला व सर्वांना सांगितली होती ती अक्षर अक्षर त्याच्या डोळ्यांसमोर घडली होती. त्यामुळे राजा मनातल्या मनात स्वनिंदा करू लागला.


"आज हे घडणार होते, म्हणूनच त्या दिवशी माझ्या कोणत्या तरी दुष्ट ग्रहाने म[illegible] डोक्यात तो शिरला. म्हणतात ना, 'देवाच्या मनात जे असते ते देव आपल्या तोंडी वदवितो' अगदी तसेच झाले." अशा तऱ्हेने निरनिराळ्या प्रकारे राजा मनातल्या मनातच स्वतःची निंदा करीत होता.

विधिलिखित जे असते तेच घडते! हेच खरे ठरले. कोणत्या तरी अतीत शक्तीच्या प्ररणेमुळेच नाही का राजाला मुलींना बाहेर घेऊन यायची बुद्धी झाली? त्या दिवसापर्यंत त्याने मनाला किती घट्ट आवळून ठेवले होते. परंतु ऐन वेळी त्याच्या बुद्धीने त्याच्याशी दगा केला. व्हायचे ते झाले.

आतां राणीजवळून लपवून ठेवण्यासारखे तरी काय उरले होते? म्हणून राजा आपल्या नोकरांचाकरांबरोबर राजवाड्यात गेला आणि त्याला बोलवत नव्हते तरी थोडक्यात जमले ते सांगून मोकळा झाला. राजा व राणी दोघे दुःखसागरात बुडून गेले.

(क्रमशः)






सुयोग्य वारसाहक्क

विक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो झाडाजवळ गेला प्रेत खांद्यावर काढून घेतले आणि नेहमीप्रमाणे मौन होऊन स्मशानाकडे चालू लागला. तेव्हां प्रेतात बसलेला वेताळ त्याला म्हणाला— "राजा! तू आपल्या समोर जे ध्येय ठेवले आहेस ते प्राप्त करण्यासाठी तू आपले सर्वस्व पणाला लावले आहेस. परंतु किती कष्ट सहन करून ध्येय प्राप्ती झाली तरी त्याचे अपेक्षित फळ मिळेलच असे नाही. त्याचे उदाहरण म्हणून मी तुला पुन्हां अमरध्वजाची गोष्टच सांगणार आहे. लक्ष देऊन ऐक." असे सांगून वेताळ गोष्ट सांगू लागला.

अमरावती नगराचा युवराज अमरध्वज शिकारीला गेला असतां वाट चुकून दाट रानात शिरला. तेथे एका भिल्लकन्येला पाहून तिच्या सौंदर्यावर इतका भाळून

वेताळाच्या गोष्टी



गेला की त्याला एका भिल्ल तरुणाशी द्वंद्वयुद्ध करून त्याला जिंकावे लागले तेव्हां कोठे त्या भिल्ल तरुणीशी त्याचे लग्न झाले व तो तिला राजधानीत घेऊन आला.

परंतु त्या भिल्लकन्येने अंतःपुरात पाऊल ठेवले त्या घटकेपासून अनेक गुंता गुतीचे प्रश्न उभे राहू लागले. तिला राजवाड्यातले वातावरण अगदी वेगळे वाटू लागले. राज-घराण्यातला चालीरीती तिला नवख्या वाटू लागल्या. या नव्या वातावरणात दासदासी अनेक होत्या, परंतु तिला आपल्या दासीं-जवळ बोलायलासुद्धा संकोच होऊ लागला. कैद्यासारखी तिची स्थिती झाली होती. [illegible] अमरध्वज काय तो तिला आपला आप्त वाटे. म्हणून ती त्याला नेहमी आपल्या महालातच अडकवून ठेवण्याचा प्रयत्न करी.

अमरध्वजला वाटे की तिच्यात हळूहळू थोडा बदल होईल. म्हणून तो तिच्या महालात राहू लागला. ती चार चौघांत मिसळून हंसू खेळू लागावी यासाठी तोच प्रयत्न करीत होता. परंतु त्याला आपल्या प्रयत्नात अपेक्षिल्याप्रमाणे यश मिळेलसे वाटेना.

अमरध्वज नेहमी अंतःपुरात राहात असल्यामुळं राज्यकारभराची सर्व कामे मंत्र्यावर व त्यांच्या विश्वासावर सोडून द्यावी लागली. परंतु हे सर्व प्रजेच्या हिताचे नव्हते.

अशा परिस्थितीत शेजारच्या राजाने अमरावती राज्यावर स्वारीची तयारी सुरू केल्याचे अमरध्वजाला कळले. तेव्हां तो अंतःपुरा बाहेर आला. त्याने आपल्या मंत्रिमंडळाची सभा बोलावून आलेल्या संकटाला कसे तोंड द्यायचे विचारले.

त्या वेळी भिल्ल तरुणी त्याचा शोध काढीत मंत्रीमंडळाच्या सभेत येऊन दाखल झाली आणि म्हणाली–"इतका वेळ मला एकटीला सोडून तू इथे बसला आहेस? चल, जाऊं या!" असे म्हणत तिने त्याचा हात धरून त्याला बाहेर ओढून नेले. [illegible] पाहून तेथे [illegible] ती सर्वच मंडळी चकित झाली. काही डोळे मिचकावून हंसली. अमरध्वजचा तो अपमान होता. तो तिच्या बरोबर अंतःपुरात गेला आणि तिला खूप रागावून म्हणाला–"मी इतके दिवस तुला काही बोध व्हावा यासाठी, केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ झाले. मी फक्त तुझा नवराच आहे का? या देशाचा युवराजसुद्धा आहे. आज तू त्यांच्यासमोर माझी मान खाली केलीस, उद्यां बरोबरीच्या राजपुरुषांमध्येसुद्धा माझा अपमान होण्याची शक्यता आहे. मी तुझ्या सौंदर्याच्या मोहाला बळी पडून तुला राजवाड्यात घेऊन आलो त्याची फळे पुष्कळ चाखली. परंतु तुझ्यात काहीच बदल घडवून आणू शकलो नाही."

तो काय म्हणतो आहे, आपली काय चूक झाली, हेदेखील तिला कळेना. त्याला आलेला राग पाहून ती वेड्यासारखी त्याच्या तोंडाकडे फक्त पहात राहली.

त्या दिवसापासून अमरध्वज फक्त रात्रीच्या वेळी तिच्या महालात जाऊ लागला. दिवसा तो तिच्या दृष्टीस पडत नाहीसा झाला. त्याच्यावरची राज्यकार-भाराची जबाबदारीसुद्धां बरीच वाढली होती. त्यानंतर शत्रूशी मोठे युद्ध झाले. त्या युद्धात अमरध्वजाने शत्रूला पिटाळून लावले व पुन्हां त्याला डोके वर काढतां



येणार नाही अशी त्याची खोड मोडली.

नवऱ्याचे जाणे येणे कमी झालेले पाहून भिल्ल तरुणीला आपल्या सभोवतीच्या वातावरणाची घृणा वाटू लागली. तिच्यात झालेला बदल अमरध्वजाच्या लक्षात आल्याशिवाय राहला नाही. या नवीन जीवनात ती समरस व्हायची तर दूरच, तिच्यावर त्याचा काही एक परिणाम झाल्याची चिह्नेसुद्धां दिसत नाहीशी झाली. तिला भिल्लांच्या वस्तीतून बाहेर घेऊन आल्याबद्दल त्याला फार वाईट वाटू लागले. त्याला तिची कीव आली. त्याने तिला पुन्हां भिल्लांच्या वस्तीत पाठवायचा विचार केला, परंतु ती गरोदर होती.



अमरावतीला दर वर्षी दसऱ्याचा उत्सव मोठ्या थाटाने होत असे. त्या वेळी मोठी जत्रा भरे. निरनिराळ्या चढाओढीचे कार्यक्रम होत. सर्वात महत्वाची चढाओढ किंवा बलप्रदर्शन म्हणजे अमरध्वज एक अत्यंत प्राचीन अशी दगडी गदा घेऊन एका हत्तीशी द्वंद्व युद्ध करी व हत्तीला ठार करी. ती गदा अमरध्वजाशिवाय आणखी कोणाला उचलता येत नसे इतकी ती जड होती. ती गदा घेऊन हत्तीशी युद्ध करणे म्हणजे सामान्य गोष्ट नव्हती.

दसऱ्याच्या उत्सवप्रसंगी या खेपेस अमरध्वज आपल्याबरोबर गंमत पहायला म[illegible] भिल्ल [illegible] घेऊन गेला. लक्षावधी लोक उत्सव पहायला जमले होते. तो विशाल जनसमुदाय पाहून भिल्ल कन्या चकित झाली व म्हणाली–"आम्ही देखील मोठमोठ्या जत्रा भरवितो, परंतु इतके लोक कधी जमत नाहीत."

"हे सर्व लोक माझा पराक्रम पाहण्यासाठी जमतात. तू असे बलप्रदर्शन पूर्वी कधी पाहिले नसशील. थोड्याच वेळात तुला दिसेल." अमरध्वज म्हणाला.

प्रदर्शन पाहण्यासाठी आलेल्या राजघराण्यातल्या लोकांना बसण्यासाठी उंच जागेवर व्यवस्था करण्यात आली होती. अमरध्वजाने पटांगणात पाऊल टाकल्या बरोबर प्रजेने टाळ्या वाजवून त्याचे स्वागत केले. त्याने दगडी गदा सहज उचलली. त्यानंतर एका मदोन्मत्त हत्तीला त्याच्यासमोर आणण्यात आले. हत्ती आणि अमरध्वज यांचे परस्परांशी भयंकर युद्ध झाले. हत्ती जोरजोराने चीत्कार करीत आपल्या सोंडेत अमरध्वजाला पकडण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु त्याच्या पकडीत न येता अमरध्वजाने हत्तीला ठार केले.

अमरध्वजावर प्रजेने पुष्पवृष्टी केली. त्याने आपल्या बायकोकडे पाहले तेव्हां ती खदखदां हसली. जवळ येऊन त्याने विचारले–"कां हसलीस?"

"[illegible] विलास की तुझी प्रजा आनंदाने पुष्पवृष्टी करते आहे?" तिने विचारले.

"ती दगडाची गदा उचलणे कोणा मानवास शक्य नाही. मी ती गदा फक्त उचललीच नाही तर ती घेऊन एका हत्तीला ठार केले. हे आश्चर्य करण्यासारखे नाही का?" अमरध्वजाने विचारले.

"ती गदा कोणाला उचलता येणार नाही, असे म्हणतोस?" तिने विचारले.

"ते उचलणारास मी आपले राज्य देईन." अमरध्वज म्हणाला.


भिल्ल तरुणी आश्चर्यचकित होऊन म्हणाली–"ती उचलण्याची शक्ती असलेले आमच्या गावात अनेक आहेत."

"आहेत तर जाऊन बोलावून घेऊन ये. जा नीघ, आतांच घेऊन ये बोलावून ही गदा उचलून दाखविणाराला. घेऊन आली नाहीस तर मात्र तू परत येण्याची गरज नाही." अमरध्वज आपल्या भिल्ल बायकोला म्हणाला.

त्याने बायकोला तिच्या भिल्लांच्या वस्तीत पाठवून दिले. ती परतआली नाही.

पंधरा वर्षे लोटली. दरवर्षी दसऱ्याचा उत्सव जत्रा व चढाओढी होत राहल्या.

सोळाव्या वर्षी दसऱ्याला त्याने दगडी गदेने एका हत्तीला ठार केले. त्या वेळी



प्रेक्षकांपैकी एका भिल्ल तरुणाने पुढे येऊन विचारले–"महाराज! मी एकदां ती दगडी गदा उचलून पाहू का?"

अमरध्वजाने त्या मुलाकडे फक्त एकदांच पाहिले व म्हणाला–"पहा, कदाचित तुला उचलतां येईल ही. ती उचलून दाखविलीस तर मी माझे राज्यच तुला देईन."

लगेच तो भिल्ल तरुण पुढे आला आणि त्याने ती गदा उचलून गरगर फिरवून आकाशात उडविली. मुलाचे बळ पाहून अमरध्वज त्याचे कौतुक करू लागला.

तेव्हां भिल्ल तरुणी पुढे येऊन म्हणाली–"पाहिलेत महाराज! आमच्या वस्तीत तुमच्याहून जास्त पराक्रमशाली वीर

आहेत !" अमरध्वजाने आपल्या बायकोच्या रूपात व त्या तरुणाच्या रूपात साम्य असल्याचे पाहून तो मुलगा आपलाच असल्याचे देखील ओळखले. त्याने, अत्यंत आनंदाने आपल्या बायकोचे स्वागत करून, मागे तिचा अपमान केल्याबद्दल तिची क्षमा मागितली.

येथवर गोष्ट सांगून वेताळ म्हणाला– "राजा! मला हे कळत नाही की भिल्ल तरुणी तिच्या वस्तीत दगडी गदा उचलणारे अनेक लोक आहेत असे सांगून पंधरा वर्षे कोणाला बोलावून घेऊन आली नाही आणि अशा तऱ्हेने ती खोटे बोलल्याचे स्पष्ट झाले असूनही अमरध्वजाने तिची क्षमा मागण्याचे कारण काय होते? या प्रश्नाचे उत्तर माहीत असूनही तू दिले नाहीस तर परिणाम तुला माहीतच आहे, तुझ्या डोक्याची शंभर शकले होऊन तुझ्याच पायांवर लोळू लागतील."

विक्रमादित्य म्हणाला–"रानटी जातीचे लोक खोटे बोलत नाहीत. इतर लोकांत जे[illegible] जास्तच असते. भिल्ल तरुणी खोटे बोलली नव्हती. तिच्या नवऱ्याच्या बरोबरीची शक्ती असलेले भिल्ल तरुण त्यांच्या वस्तीत होते. परंतु त्यांना आणून नवऱ्याला राज्यच्युत करणे तिला इष्ट वाटले नसावे. तिचा मुलगा मोठा होऊन बापाच्या बरोबरीचा निघाला तर तोच बापाच्या वारसा हक्काला योग्य ठरेल असे वाटून तिने तो सोळा वर्षांचा होईपर्यंत वाट पाहिली आणि तिच्या वस्तीत नवऱ्याच्या बरोबरीने शक्ती असलेले तरुण असल्याचे तिने सिद्ध करून दाखविले. अमरध्वजाने विचार केला की त्याचा वारसा चालू ठेवण्यास योग्य मुलगा त्या भिल्लणीच्या पोटी जन्मलेला आहे. अशा बायकोचा आपण अपमान केला होता, ते आठवून त्याने क्षमा मागितली."

अशा तऱ्हेने राजाचे मौन भंग झाल्यामुळे वेताळ प्रेतासह अदृश्य झाला आणि पुन्हां झाडाला जाऊन लोंबकळू लागला.

(कल्पित)





वृत्ति देवता

कित्येक वर्षे होऊन गेली चीन देशातल्या एका गावी चँगला नावाचा एक टोप्या विकणारा व्यापारी रहात असे. टोप्या शिवण्याचा धंदा त्याच्या घरात पिढ्यान् पिढ्या चालत आला होता. चँगच्या बापाने त्या धंद्यात अलोट संपत्ती संपादन केली आणि मरते वेळी ती सर्व संपत्ती मुलाला देत त्याने त्याला टोपी शिवण्याचा धंदा न सोडण्यास बजावून सांगितले.

परंतु चंगला याला टोपी शिवण्याचा धंदा करणे हीनपणाचे वाटले. परंतु तो धंदा सोडून दिला तर वृत्तिदेवतेला कदाचित राग येईल असा विचार करून त्याने ती वृत्ती म्हणजे धंदा सोडला नाही. तो बेफिकीरपणे टोप्या शिवू लागला आणि जास्त किंमत मागू लागला. तेव्हां गावकऱ्यांनी शेजार गावच्या वांगला नावाच्या टोपीवाल्याला बोलावून आणले.

वांगला हा टोपी शिवण्याच्या धंद्यात निष्णात होता. तो टोप्यांबरोबर निरनिराळ्या प्रकारच्या पिशव्यासुद्धा शिवत असे. त्याने चँगला याच्या दुकानासमोरच आपले दुकान उघडले. गावकऱ्यांनी त्याच्या दुकानातल्या टोप्या घ्यायला सुरवात केली.

एकदां चँगला आपल्या दुकानात स्वस्थपणे बसला असतां त्याने समोरच्या वांगला याच्या दुकानात एका साधूला शिरतांना पाहिले. त्या साधूजवळ सोन्यासारखे चमकणारे एक मृगचर्म होते. ते त्याने वांगला याला दिले व त्याची एक झोळी शिवून ठेवायला सांगून तो निघून गेला.

वांगलाने त्या दिवशी सर्व काम संपवून त्या साधूला हवी होती तशी झोळी शिवली आणि ती भिंतीला टांगून ठेवली.

दुसऱ्या दिवसापासून वांगला गांवकऱ्यांना फुकट टोप्या देऊ लागला व साधू

श्री कणाजी अ. पाटील

संन्याश्यांना मेजवान्या देऊ लागला. काल नाहीतर परवां आलेला हा वांगला इतका दानधर्म करू लागला आहे तर त्यात काहीतरी गुपित असले पाहिजे आणि ते काय, हे माहिती करून घेतले पाहिजे असे चँगलाने मनाशी ठरविले.

एके दिवशी वांगलाने आपले दुकान बंद केल्याबरोबर चँगला त्याच्या दुकाना-जवळ जाऊन फळयांच्या सांधीतून आत वांगला काय करतो आहे, पाहू लागला. वांगला आत साधूसाठी त्याने शिवून तयार केलेली झोळी झाडीत होता. त्या झोळीतून सोन्याची नाणी जमिनीवर पडत होती.

चँगलाला स्वतःच्या डोळ्यावर विश्वास बसेना. दुसऱ्या दिवशीसुद्धां पुन्हां तेच दृश्य पाहिल्यावर ती झोळी उडविण्याची दुर्बुद्धी चँगलाला झाली.

वांगला कोणत्यातरी कामासाठी दुसऱ्या दिवशी दुकानातून आत गेला असतां चँगला वांगलाच्या दुकानांत शिरला आणि भिंतीला टांगलेली झोळी काढून घेऊन त्या जागी अ[illegible] तशीच एक नकली झोळी ठेवून आपल्या दुकानात निघून आला.

त्या **दिवशी** काळोख पडल्यावर चँगला आपले **दुकान** बंद करून चोरून आणलेली झोळी झाडू लागला. त्या झोळीतून सोन्याची नाणी तर पडलीच नाहीत, त्याबद्दल चँगच्या घरात ज्या सोन्याच्या काही वस्तू होत्या त्यातल्या काही नाहीशा झालेल्या दिसल्या.

चँगला हताश झाला आणि वांगला याच्याकडे गेला आणि घडलेली गोष्ट सांगून म्हणाला–"तूच माझे या संकटातून रक्षण कर!" वांगलाच्या दुकानात पुष्कळ गर्दी जमली. गर्दीतून तो साधू बाहेर आला आणि म्हणाला–"चँगला! तुला तुझ्या धंद्यावर श्रद्धा निष्ठा नाही. आतां तुला ती झोळीच कायमची लाभली आहे." असे सांगून साधू अदृश्य झाला.

त्या दिवसापासून चँगला ती झोळी खांद्याला अडकवून भीक मागू लागला. 'वृत्ति देवता त्या साधूच्या रूपाने प्रगट झाली होती' असे लोक म्हणू लागले.



१५४. पांढरा हत्ती

ऐरावत हा पांढरा हत्ती असतो असे म्हणतात. हत्तींत रंग नसलेल्या त्वचेचा "अल्बीनो" नावाचा एक हत्ती असतो. सयाम देशात त्या हत्तीला फार पवित्र मानतात. अशा हत्तींमध्ये बुद्धाचा आत्मा असतो असा त्यांचा विश्वास आहे. जंगलातून या पांढऱ्या हत्तींना धरून आणल्यावर बौद्ध पुजारी त्या हत्तीजवळ जाऊन "तू परत जंगलात जाऊ नकोस. तेथे तुझी सेवा करायला कोणी नाही. धुळीत पडून राहणे चांगले नाही." असे म्हणतात. सयामातल्या एका राजाने, त्याच्या पकडीत न येणाऱ्या सेवकाला एक पांढरा हत्ती दिला आणि त्याला पोसता पोसतां त्या सेवकाचे दिवाळे निघाले.

